# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 18/11/2023 (शनिवार) सकाळ

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत १२ किमी अंतरावरील मौजा पानमारा येथे दिनांक १७/११/२०२३ चे ११.३० वा. ते १३.०० वा. दरम्यान फिर्यादी हे पोलीस स्टेशनच्या स्टाफ सोबत पोस्टे मौदा परिसरात पेट्रोलींग करीत असता मुखबिराद्वारे माहीती मिळाली की, एक इसम अशोक लेलॅंड गाडी क्र. **MH40 BG-5463** मध्ये प्राण्यांना निर्दयतेने वागणुक देत चारा पाण्याची सोय न करता भंडारा येथुन नागपुरकडे जनावरे नेत आहे. अशा विश्वसनिय खबरेवरून शहानिशा करणे कामी पोलीस स्टेशन मौदा येथील स्टाफ यांनी महादुला फाटा येथे नाकाबंदी केली असता भंडारा कडून नागपुरकडे जाणारी अशोक लेलॅंड गाडी क्र. **MH-40/BG5463** चा चालक **आरोपी नामे– सागर पितांबर आकरे, वय २५ वर्षे रा. खरबी नाका जि. भंडारा** याला थांबवुन वाहनाची तपासणी केली असता वाहनामध्ये १ पांढऱ्या रंगाची गाय किंमती १०,०००/–रु. १ लाल रंगाची गाय किंमती १०,०००/–रु १ लाल गोरी किंमती १०,०००/–रु ३ काळे गोरे प्रत्येकी ६०००/–रु प्रमाणे एकुण १८,०००/–रु व २ लाल रंगाचे गोरे प्रत्येकी ६०००/–रु एकुण १२,०००–/रु असे एकुण ६०,०००/–रु चे ज्यांचे मुस्क्या बांधुन वाहनाच्या पल्ल्याला जनावरांना हालचाल करता येणार नाही अशा पद्धतीने बांधुन त्यांना क्रुरतेची वागणुक देत वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीचे ताब्यातून अशोक ले लॅंड गाडी क्र. **MH-40/ BG-5463** किंमती २,५०,०००/–रु व आठ गोवंश किंमती ६०,०००/–रु असा एकुण ३,१०,०००/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करून जनावरे यांना संरक्षणार्थ व संवर्धना करीता गौशाला येथे दाखल करण्यात आले आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– पोलीस हवालदार श्री. गौतम मेश्राम पोस्टे मौदा यांचे रिपोर्टवरून पो. स्टे. मौदा येथे वरील आरोपीविरुध्द कलम ११ (१) (ड) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक उरकुडे मो. नं. ८३२९०४७५८८ हे करीत आहे.



पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर